भारतीय नागरीक सुरक्षा संहितचे कलम २७५ अन्वये आरोपीला सांगावयाचा अपराधाचा तपशिल.

धुळे येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालयात

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २०२८/२०२६**

| | |
|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – ०२.०८.२०२६ |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांक | – २०.०८.२०२६ |
| ३. फिर्यादीचे नांव व पत्ता | – सोनगीर पोलीस स्टेशन, धुळे |
| ४. आरोपीचे नांव पत्ता | – **बद्री भैरूलाल गुजर**<br>वय – २६ वर्षे, धंदा – विक्रेता<br>रा. सोनगीर, ता. जि. धुळे. |

अपराधाचा तपशिल –

दिनांक ०२.०८.२०२६ रोजी १७.५० वाजेच्या सुमारास सोनगीर फाटा येथे सार्वजनिक जागी तुम्ही आईस्क्रीमचे प्लॅस्टीकचे कप, घाण पाणी व इतर कचरा रस्त्यावर फेकून लोकांचे आरोग्यास धोका निर्माण करून व सार्वजनिक उपद्रवाची पुनरावृत्ती करतांना मिळुन आला म्हणून भारतीय न्याय संहिता कलम २९३ अन्वये शिक्षेस पात्र आणि या न्यायालयाच्या दखलगीरीतील गुन्हा केला आहे.

**आरोपीचे निवेदन**

प्रश्न क्र.१ – तुम्हास कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हास अपराधाचा तपशिल समजला काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र.३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

(माधुरी अ. चौधरी)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.३), धुळे.

दिनांकः–२०.०८.२०२६

## न्यायनिर्णय

आज आरोपी हजर. त्याचे प्रतिकथन नोंदविले. त्याने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला. त्याने सांगितले की, त्याचा सदरचा पहिला गुन्हा आहे, आरोपी मजुरी करुन स्वतःचा उदरनिर्वाह व पालनपोषण करतो तसेच असा गुन्हा पुन्हा त्याच्या हातून घडणार नाही हे सांगितले आणि शेवटी कमीत कमी दंड आकारण्याची विनंती केली.

आरोपीचे प्रतिकथन आणि गुन्हयाचे स्वरुपाचा व आरोपीच्या विनंतीचा विचार करता, न्यायालयाला वाटते की, न्यायाच्या हितासाठी आरोपीला कमीत कमी शिक्षा करणे न्यायसंगत व योग्य होईल. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपी **बद्री भैरूलाल गुजर** याला भारतीय नागरीक सुरक्षा संहितचे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम २९३ खाली दोषी धरणेत येऊन त्याला रक्कम ५००/- (अक्षरी रुपये पाचशे) दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने ०२ दिवसाचा साधा कारावास सोसावयाचा आहे.

(माधुरी अ. चौधरी)

दिनांकः-२०.०८.२०२६ प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.३), धुळे.

Fine / Penalty Rs. 500/-
Paid by Accused.
20.8.26
Asstt. Supdtt.
Court No.2, Dhule

बद्री लाल
2CU929220